स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट** **दिनांक – ०८/०९/२०२३**

## पिंपरी चिंचवड आयुक्तालयात संघटित गुन्हेगारीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी “मोका पॅटर्न ” गायकवाड टोळी, विटकर टोळी, या ०२ टोळयांवर मोका अंतर्गत कारवाई.

**मा.पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, श्री. विनय कुमार चौबे यांनी कार्यभार घेतल्यानंतर** गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईने लक्ष देवुन शरिराविरुध्दचे व मालाविरुध्दचे गुन्हे करणारे व लोकांमध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्याबाबत पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत. **मा.पोलीस आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली सन २०२३ मध्ये आजपावेतो पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील २९ संघटीत गुन्हेगारी टोळयांमधील एकुण २४५ आरोपींवर मोका कायद्यांतर्गत कारवाई केली आहे.**

**१) भोसरी पोलीस ठाणे गु.र.नं. २९८/२०२३, भादंवि.३९२,३८४,३२३,५०४,५०६,३४** या गुन्हयांचे तपासमध्ये आरोपी नामे **(१) सुमेध ऊर्फ गोट्या लहु गायकवाड,(टोळी प्रमुख)** वय २६ वर्षे, रा. सांस्कृतिक भवन शेजारी सिध्दार्थनगर, दापोडी पुणे **(२) अनिकेत ऊर्फ बॉक्सी शिरीष पठारे,** वय २४ वर्षे, रा. कमलकुंज वार्ड नं. ५, दापोडी पुणे यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर **टोळी प्रमुख** व त्याचा साथीदार याचेवर **एकुण ०७ गंभीर गुन्हे** केल्याची नोंद आढळुन आलेली आहे.

**२) दिघी पोलीस ठाणे, गुन्हा.रजि.नं. २७८/२०२३ भादंवि. ३८४, ३८५, ५०६, ३४, आर्म ॲक्ट ४(२५), महा.पो.का.कलम ३७(१)(३) सह १३५** चे तपासामध्ये आरोपी नामे **(१) शाम रवि विटकर, (टोळी प्रमुख)** वय २२ वर्षे, रा. साठेनगर, पद्मावती रोड, आळंदी ता.खेड, जि. पुणे **(२) ज्ञानेश्वर सिध्दार्थ बडगे** वय ३० वर्षे रा.साठेनगर, पद्मावती रोड, आळंदी ता.खेड जि.पुणे **(३) राकेश सुरेश काळे** वय- २३ वर्षे रा.भगवान गडाचे शेजारी, अण्णाभाऊ साठेनगर, आळंदी देवाची ता.खेड जि.पुणे **(४) अजय किसन देवरस** वय-२३ वर्षे रा. पद्मावती झोपडपट्टी, आळंदी देवाची, पुणे यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर टोळी प्रमुख व त्याचे साथीदार यांच्यावर एकुण ०९ गंभीर गुन्हे केल्याची नोंद आढळुन आलेली आहे.

वरील **दोन्ही टोळी प्रमुख यांनी त्यांचे साथीदारांसह** अन्य सदस्यांसाठी प्रत्येक गुन्हयात काही सामाईक व काही नवीन साथीदार यांना सोबत घेवुन स्वतःची संघटीत टोळी तयार करुन अवैध मार्गाने आर्थिक फायदा मिळवण्याचे उद्देशाने स्वतःचे गुन्हेगारी टोळीचे वर्चस्व व दहशत प्रस्थापित ठेवण्यासाठी संघटित गुन्हेगारी संघटनेचा प्रमुख म्हणुन किंवा संघटनेच्या वतीने एकटयाने किंवा संयुक्तपणे, हिंसाचाराचा वापर करुन अथवा हिंसाचाराची धमकी देवुन किंवा धाक दपटशहा दाखवुन टोळी प्रमुख व साथीदार यांनी **भोसरी, दिघी,आळंदी, सांगवी,चतुःश्रृंगी, फरासखाना, येरवडा** पोलीस स्टेशन हद्दीत पोलीस स्टेशन हद्दीत **खुनाचा प्रयत्न करणे, गंभीर दुखापत, जबरी चोरी, खंडणी, दरोडा,दुखापत करणे, पुरावा नष्ट करणे, गैरकायदयाची मंडळी जमवुन सदोष मनुष्यवध करण्याचा प्रयत्न करणे, बेकायदेशिररित्या घातक शस्त्र व घातक हत्यारे जवळ बाळगणे, बेकायदेशिररित्या जमाव जमवुन खुनाचा प्रयत्न करणे, विनयभंग करणे, पोलीसांनी कायदा व सुव्यवस्था राखणेकामी काढलेल्या आदेशांचा भंग करणे,** अशा प्रकारेचे गंभीर स्वरुपाचे चढत्या क्रमाने गुन्हे दाखल आहेत. प्रत्येक गुन्हा करताना त्यांनी वैयक्तिक व टोळीचे वर्चस्व वाढावे व आर्थिक फायदा व्हावा तसेच जनमाणसात दहशत रहावी हाच उद्देश ठेवून टोळी प्रमुखांनी गुन्हे केलेले आहेत.

सदर **गायकवाड टोळी, विटकर टोळी या दोन्ही संघटीत टोळीतील** साथीदार यांनी आपल्या गुन्हेगारी टोळीचे वर्चस्व रहावे व आर्थिक फायदयासाठी संघटीतपणे दहशतीचे मार्गाने स्वतःचे बेकायदेशिरपणे आर्थिक फायदयाकरीता सदरचे गुन्हे केल्याचे दिसुन आल्याने, तसेच त्यांचे वर्तनात सुधारणा होत नसल्याने प्रस्तुत गुन्ह्यांमध्ये महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१) (ii), ३(४) प्रमाणेचा अंतर्भाव करणे बाबतचा प्रस्ताव पोलीस आयुक्त कार्यालय येथे सादर केला असता सदर प्रस्तावा मधील कागदपत्रांची छाननी करुन नमुद गुन्ह्यांत **महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१) (ii), ३(४) या कलमांचा अंतर्भाव करण्याचे आदेश मा. श्री.वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड** यांनी पारीत केलेले आहे.

सदरची उल्लेखनिय कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. विनय कुमार चौबे, मा. पोलीस सह आयुक्त डॉ. संजय शिंदे, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. वसंत परदेशी, मा.पोलीस उप-आयुक्त (गुन्हे) स्वप्ना गोरे मॅडम, मा. पोलीस उप-आयुक्त (परि-०१) श्री. विवेक पाटील, मा.सपोआ श्री. बाळासाहेब कोपनर (गुन्हे-१), मा.सपोआ श्री. सतिश कसबे (पिंपरी विभाग), मा.सपोआ राजेंद्रसिंग गौर (चाकण विभाग), यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि पी.सी.बी (गुन्हे शाखा), वपोनि भास्कर जाधव, (भोसरी पो.स्टे), वपोनि श्री. मच्छिंद्र पंडित (दिघी पो.स्टे), पोउपनि बालाजी जोनापल्ले (भोसरी पो.स्टे) पोउपनि सुनिल भदाने (दिघी पो.स्टे) तसेच अंमलदार पो.हवा सचिन चव्हाण, पो.हवा. व्यंकप्पा कारभारी, (पी.सी.बी. गुन्हे शाखा), पोहवा राजेंद्र राठोड, पोशि वसंत दळवी,चेतन साळवे (भोसरी पो. स्टे.), पोहवा किशोर कांबळे, पोशि वैभव काकडे (दिघी पो.स्टे.) यांचे पथकाने केली आहे.

## १) टोळी प्रमुख व सदस्यांवर दाखल असलेले वैयक्तीक गुन्हे

(१) **सुमेध ऊर्फ गोट्या लहु गायकवाड, (टोळी प्रमुख)** वय २६ वर्षे, रा. सांस्कृतिक भवन शेजारी सिध्दार्थनगर, दापोडी पुणे **(भोसरी पो.स्टे)**

| अ.नं. | पो.स्टे. | गु.र.नं. | कलम. |
|---|---|---|---|
| १ | भोसरी | २९८/२०२३ | भादंवि. ३९२,३८४,३२३,५०४,५०६,३४ |
| २ | भोसरी | ११३/२०२२ | भादंवि. ३९५,४२७, आर्म ॲक्ट ४(२५), |
| ३ | भोसरी | ७०/२०२२ | भादंवि. ३०८,३३६,३३७,३२३,१४३,१४७,१४९ |
| ४ | भोसरी | ४९७/२०१९ | भादंवि. ३२४,५०६,३४ |
| ५ | फरासखाना,पुणे | १६३/२०१९ | भादंवि.३०७,२०१,३२६,३४,आर्म ॲक्ट ३(२५) |
| ६ | येरवडा | ८९४/२०१७ | भादंवि. ३२४,३२३,५०४,३४ |
| ७ | सांगवी | ९६/२०१६ | भादंवि. ३०७,३२३,३४, आर्म ॲक्ट ४(२५) |

**(२)अनिकेत ऊर्फ बॉक्सी शिरीष पठारे,** वय २४ वर्षे, रा. कमलकुंज वार्ड नं. ५, दापोडी पुणे

| अ.नं. | पो.स्टे. | गु.र.नं. | कलम. |
|---|---|---|---|
| १. | भोसरी | २९८/२०२३ | भादंवि. ३९२,३८४,३२३,५०४,५०६,३४ |
| २. | भोसरी | ११३/२०२२ | भादंवि. ३९५,४२७, आर्म ॲक्ट ४(२५), |
| ३. | भोसरी | ७०/२०२२ | भादंवि. ३०८,३३६,३३७,३२३,१४३,१४७,१४९ |

## २) टोळी प्रमुख व सदस्यांवर दाखल असलेले वैयक्तीक गुन्हे

**(१) शाम रवि विटकर, (टोळी प्रमुख)** वय २२ वर्षे, रा. साठेनगर, पद्मावती रोड, आळंदी ता.खेड, जि. पुणे **(दिघी पो.स्टे)**

| अ.नं. | पो.स्टे. | गु.र.नं. | कलम. |
|---|---|---|---|
| १ | दिघी | २७८/२०२३ | भादंवि.३८४,३८५, ५०६, ३४, आर्म ॲक्ट ४(२५) |
| २ | भोसरी | २२९/२०२२ | भादंवि.३०७,३२४,१४३,१४७,१४८,१४९, आर्म ॲक्ट ४(२५) |
| ३ | चतुश्रृंगी | ४९०/२०२२ | भादंवि.३०८,१४३,१४४,१४७,१४८,१४९,४२७ क्रि.लॉ.क.३, ७ |
| ४ | आळंदी | ९२/२०२१ | भादंवि.३०७,१४३,१४७,१४८,१४९,१८८, क्रि.लॉ. क. ७ |
| ५ | आळंदी | २३६/२०२० | भादंवि.३०७,५०४,५०६, आर्म ॲक्ट ४(२५) |
| ६ | चतुश्रृंगी | ८७१/२०२० | भादंवि.३२४,३२३,५०४,५०६ |
| ७ | चतुश्रृंगी | ४६८/२०१७ | भादंवि.३२६,३४ |

**(२) ज्ञानेश्वर सिध्दार्थ बडगे,** वय ३० वर्षे, रा. साठेनगर, पद्‌मावती रोड, आळंदी

| अ.नं. | पो.स्टे. | गु.र.नं. | कलम. |
|---|---|---|---|
| १ | दिघी | २७८/२०२३ | भादंवि.३८४,३८५, ५०६, ३४, आर्म ॲक्ट ४(२५) |
| २ | भोसरी | २२९/२०२२ | भादंवि.३०७,३२४,१४३,१४७,१४८,१४९, आर्म ॲक्ट ४(२५) |

**३) राकेश सुरेश काळे,** वय २३, रा. भगवान गडाचे शेजारी, अण्णाभाऊ साठेनगर, आळंदी देवाची

| अ.नं. | पो.स्टे. | गु.र.नं. | कलम. |
|---|---|---|---|
| १ | दिघी | २७८/२०२३ | भादंवि.३८४,३८५, ५०६, ३४, आर्म ॲक्ट ४(२५) |
| २ | भोसरी | २२९/२०२२ | भादंवि.३०७,३२४,१४३,१४७,१४८,१४९, आर्म ॲक्ट ४(२५) |
| ३ | आळंदी | ७७/२०१८ | भादंवि. ३५४,५०४,५०६,३४ |
| ४ | आळंदी | १३४/२०१७ | भादंवि. ३९५ |

**(४) अजय किसन देवरस,** वय २३ वर्षे, रा. पद्‌मावती झोपडपट्टी, आळंदी देवाची पुणे

| अ.नं. | पो.स्टे. | गु.र.नं. | कलम. |
|---|---|---|---|
| **१** | दिघी | २७८/२०२३ | भादंवि.३८४,३८५, ५०६, ३४, आर्म ॲक्ट ४(२५) |
| **२** | भोसरी | २२९/२०२२ | भादंवि.३०७,३२४,१४३,१४७,१४८,१४९, आर्म ॲक्ट ४(२५) |
| **३** | आळंदी | ९२/२०२१ | भादंवि.३०७,१४३,१४७,१४८,१४९,१८८, क्रि.लॉ. क. ७ |
| **४** | आळंदी | ७७/२०१८ | भादंवि. ३५४,५०४,५०६,३४ |
| **५** | आळंदी | १३४/२०१७ | भादंवि. ३९५ |

**(स्वप्ना गोरे)**
पोलीस उप-आयुक्त (गुन्हे)
पिंपरी चिंचवड आयुक्तालय